# Washim District Police

**Nature of Work :- Solving Sensational Crime**

**Police Station :- Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done :- 24/12/2019**

**Brief of the work done :-**

वाशीम रहस्यमय खुनाचा स्थागुशा कडून उलगडा दि २४/१२/२०१९

## रहस्यमय खुनाचा स्थागुशाकडून उलगडा

### आसेगाव पेन नदी परिसरात झाली घटना



पोलिसांनी अटक केलेले आरोपी व पोलिस पथक

**वाशीम, २३ डिसेंबर**

तालुक्यातील आसेगाव पेन नदीवरील परिसरात झालेल्या संदीप शेषराव बकाल या युवकाच्या रहस्यमय मृत्यूचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेने केला असून, याप्रकरणी पोलिसांनी मृतकाचे नातेवाईक असलेल्या आरोपींना अटक केली आहे.

६ डिसेंबर २०१९ रोजी रिठद येथील रहिवासी रवी संतोष यांनी पोस्टे रिसोड येथे तक्रार नोंदविली .त्यात म्हटले की,त्याचा आतेभाऊ संदीप शेषराव बकाल याचे धानोरा वाकुडकर येथील एका मुली सोबत प्रेम संबंध आहेत. २७ नोव्हेंबर २०१९ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास संदीप हा त्याच्या शेतात हजर असतांना त्याला फोन आला व त्यातून त्याला शेतात येण्यास सांगितले होते.

त्याने मला संध्याकाळी वाशीम येथे मित्राकडे पार्टीला जायचे आहे, असे सांगितले असे तक्रारदार रवी संतोष याने म्हटले आहे. त्याच दिवशी संध्याकाळी रिठद येथील बसस्टॅन्डवरील सलून दुकानात संदीप यास पुन्हा फोन आला. फोन बंद झाल्यानंतर संदीपने पेट्रोल टाकून येतो असे सांगून तो रिठद स्टॅन्डवरून निघून गेला. बराच वेळ होऊनही संदीप परत आला नाही म्हणून त्यास बरेच फोन केले रात्री १०.३० वाजता त्याचा मोबाईल स्वीच ऑफ आला.असेही रवी याने पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे.

३ डिसेंबरपर्यंत संदीप कोठेच मिळून न आल्याने संदीपच्या वडिलांनी रिसोड पोलिस ठाण्यात संदीप हरविल्याबाबत तक्रार नोंदविली.

६ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास आसेगाव पेन येथील नदीत कोणीतरी माणूस पाण्यात बुडून मरण पावल्याची माहिती लोकांनी दिली.पोलिसांना ही माहिती मिळाल्यावर त्यांनीही घटनास्थळाला भेट देवून लोकांच्या मदतीने पेन नदीतून प्रेत बाहेर काढले. तेव्हा त्या प्रेताचे पाय मोटार सायकलला बांधलेले आढळून आले.

जवळ जाऊन पाहिले असता, मृत इसम संदीप असल्याचे पाहणाऱ्यांनी व नातेवाईकांनी ओळखले. संदीप यास कोणीतरी अज्ञात इसमांनी मारून त्याचे दोन्ही पाय मोटर सायकलला बांधून नदीचे पाण्यात टाकून दिले अशा रिपोर्ट वरून रिसोड पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने घटनास्थळास तात्काळ सहायक पोलिस अधीक्षक डॉ.पवन बनसोड, पोनि शिवाजी ठाकरे यांनी त्यांचे पथकासह भेट दिली. घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करून तपास अधिकाऱ्यांना महत्वाच्या सूचना दिल्या. पोलिस शिवा ठाकरे यांनी स्वतः त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी कर्मचाऱ्यासह रिसोड, वाशीम परिसरात फिरून मृतक संदीप बकाल याच्या माहिती घेतली असता संदीप हा अविवाहित असून, तो लग्नासाठी असमर्थता दर्शवित होता. त्यामुळे शेवटी त्याच्या वडिलांनी कंटाळून संदीप याच्या परवानगीने संदीप पेक्षा लहान असलेला मुलगा प्रदीप याचे २०१८ मध्ये लग्न करून दिले अशी माहिती पोलिसांना मिळाली. संदीप याचे धानोरा येथील मुलीसोबत एकतर्फी प्रेम होते. त्यातच त्याने तिच्या नातेवाईकांकडे लग्नासाठी मागणी सुध्दा केली होती. परंतु, मुलीच्या नातेवाईकांनी त्यास नकार दिला होता. संदीप यांचे जवळ नेहमी मोठी रक्कम राहत होती. याबाबत मिळालेल्या माहितीवरुन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून फिर्यादी रवी संतोष आरु , मृतकाचा मावसभाऊ राहुल इंगोले, मंगेश इंगोले, संतोष उर्फ गोलू इंगोले सर्व रा. शिरसाळा तसेच मृतक संदीप याचा सख्खा भाऊ प्रदीप शेषराव बकाल रा. धोडप यांना स्थागुशाच्या कार्यालयात वाशीम येथे तपासकामी बोलावून तपास केला असता प्रदीप शेषराव बकाल याने राहुल गजानन इंगोले, संतोष उर्फ गोलू रतन इंगोले, रामप्रसाद सुभाष इंगोले यांच्या मदतीने संदीप बकाल यास ठार मारुन त्याचे प्रेत मोटार सायकलसह आसेगाव पेन येथील नदीच्या पाण्यात टाकून दिल्याची कबुली दिली. अशा या रहस्यमय खुनाचा तपास पोलिसांनी लावून आरोपींना अटक केली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

Scanned with CamScanner

* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

दि.२३/१२/१९

---

## स्थानिक गुन्हे शाखा वाशिम ची कारवाई.

## आसेगांव पेन नदीवरील रहस्यमय खुनाचे दाखल गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेकडुन उलगडा.

दिनांक ०६/१२/१९ रोजी फिर्यादी रवि संतोष आरू वय २५ वर्ष रा रिठद ता.जि.वाशिम यांनी पो.स्टे. रिसोड येथे तक्रार नोंदविली की,त्याचा आतेभाऊ संदीप शेषराव बकाल वय २८ वर्ष रा.घोडप उगले ता.रिसोड याचे धानोरा वाकुडकर येथील एका मुली सोबत प्रेम संबंध आहेत तो नेहमी त्या मुलीसोबत मोबाईलवर बोलतो याबाबतची माहीती त्याचे आई वडील भाऊ व जवळच्या सर्व नातेवाईकांना आहे. दि.२७/११/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. चे सुमारास शेतात हजर असतांना संदीप बकाल याचा फोन आला की,रिठद येथे आलो आहे त्यास शेतात येण्यास सांगीतले असता तो त्याचे मोटार सायकल बजाज एक्स सीडी क्रमांक एम.एच.३७ ई ३७६५ ने शेतात आला त्यास अचानक येण्याचे कारण विचारले असता त्याने सोनखास येथुन आलोत असल्याचे सांगीतले त्यास जेवणाविषयी विचारले असता त्याने मला संध्यकाळी वाशिम येथे मित्राकडे पार्टीला जायाचे आहे असे सांगीतले संदीप हा त्या दिवशी वेळोवेळी फोनवर बोलत होता सध्याकाळी रिठद येथील बसस्टॅन्डवर सलुनचे दुकानात संदीप यास पुन्हा फोन आला त्यावेळी संदीप हा दुर अंतरावर जावुन बोलत होता. फोन बंद झाल्यानंतर संदीप ने पेट्रोल टाकुन येतो असे सांगुन रिठद स्टॅन्डवरुन निघुन गेला. बराच वेळ होवुन संदीप परत आला नाही म्हणुन त्यास बरेच फोन केले रात्री १०.३० वा.त्याचा मोबाईल स्विच ऑफ आला दुसरे दिवशी संदीप चे वडीलांनी फोन करुन विचारपुस केली असता त्यांना वरील प्रमाणे सांगीतले. दि.०३/१२/२०१९ पर्यंत संदीप मिळुन न आल्याने संदीपचे वडीलांनी पोलीस ठाणे रिसोड येथे संदीप हरविल्यबाबत तक्रार नोंदविली दि. ०६/१२/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास गावात चर्चा सुरु होती की, आसेगाव पेन येथील नदीत कोणीतरी माणुस पाण्यात बुडुन मरण पावला आहे. म्हणुन मी असेगाव पेन येथील नदीवर गेलो थोड्या वेळाने पोलीस आले पोलीसांनी लोकांच्या मदतीने प्रेत बाहेर काढले तेव्हा त्या प्रेताचे पाय मोटार सायकलला बांधलेले आढळुन आले जवळ जावुन पाहीले असता मृत ईसम संदीप असल्याचे ओळखले. संदीप यास कोणीतरी अज्ञात ईसमांनी २७/११/२०१९ चे रात्री ०८.४५ ते दि.०६/१२/२०१९ चे १३.०० वा.दरम्यान मारुन दोन्ही पाय मोटर सायकला बांधुन नदीचे पाण्यात टाकुन दिले अशा रिपोर्ट वरुन पोलीस ठाणे रिसोड येथे गुन्हा रजीष्टर नंबर ५३०/१९ कलम ३०२,२०१ भादंवी अन्वये गुन्हा नोंदवुन तपासात घेतला.

गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने घटनास्थळास तात्काळ सहायक पोलीस अधिक्षक डॉ.पवन बनसोड,पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे यांनी त्यांचे पथकासह भेट दिली घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करुन तपास अधिकारी यांना महत्वाच्या सुचना दिल्या. तसेच गुन्हयाचे तपासाबाबत वेळोवेळी पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांना माहीती देवुन तपास कामी मार्गदर्शन घेण्यात आले.गुन्हयाचा प्राथमीक तपास सुरु असताना फिर्याद मध्ये नमुद असलेल्या विषयाचे संबंधाने धानोरा वाकुडकर येथील मृतक बकाल यांची प्रेमीका व त्यांचे नातेवाईक तसेच फिर्यादी रवि आरु,संदीप चे मित्र शिरसाळा येथील संतोष इंगोले यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन बारकाईने विचारपुस करण्यात आली परंतु गुन्हा उघडकिस येईल अशी कोणाकडुनही माहीती प्राप्त झाली नाही.पोलीस निरीक्षक स्थानीक गुन्हे शाखा श्री शिवा ठाकरे यांनी स्वतः त्यांचे अधिनस्त्याखालील अधिकारी कर्मचा-यासह रिसोड,वाशिम परीसरात सतत फिरुन मृतक संदीप बकाल याचे पुर्व इतीहासाबाबत गोपनिय रित्या माहीती घेतली असता अशी माहीती मिळाली की,मृतक संदीप हा तरुण असुन त्याचे लग्न झालेले नाही त्यास मागील तिन ते चार वर्षापासुन त्याचे आई वडील व नातेवाईक लग्नाकरीता मुली दाखवित आहे परंतु तो काहीना काही कारणावरुन मुली नापसंत करत शेवटी वडीलांनी कंटाळुन संदीप याचे परवानगीने संदीप पेक्षा लहान असलेला मुलगा प्रदीप याचे सन २०१८ मध्ये लग्न करुन दिले. संदीप याचे धानोरा येथील मुलीसोबत एकतर्फी प्रेम होते

Scanned by CamScanner


विशेष कार्यकारी दंडाधिकारी
सहा पोलीस निरीक्षक स्थानिक
गुन्हे शाखा,वाशिम
महाराष्ट्र पोलीस